संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत संत तुकाराम वनग्राम योजनेच्या बक्षिस वितरणाकरिता चालू बाब प्रस्ताव सन २०१८-१९

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम-२०१९/प्र.क्र.१४ /फ-२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २६ फेब्रुवारी, २०१९

वाचा :- १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/यो/इए/प्र.क्र.०१/(१८-१९)/१९२२, दि.२४.१.२०१९

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.

३) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५.०१.२०१९.

प्रस्तावना :-

अप्पर प्रधान मुख्य वन संरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य नागपुर यांनी संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रान्वये सन २०१८-१९ करिता राज्य योजनांतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या योजनेंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत संत तुकाराम वनग्राम योजनेखाली पुरस्कार वितरणासाठी रु.७५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

सन २०१८-१९ करिता राज्य योजनेअंतर्गत "ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम " (२४०६ १५२१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता एकूण रु. ५४६७.८८ लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पित करण्यात आला असुन सन २०१८ च्या पावसाळी अधिवेशनात रु. ३०००.०० लक्ष नियतव्यय पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत या योजनेकरिता एकूण रु. ८४६७.८८ लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पित आहे. शासन परिपत्रक वित्त विभाग दि. २५.१.२०१९ अन्वये संबंधित प्रशासकीय विभागास महसुली लेख्यातील कार्यक्रम खर्चाच्या बाबीवर एकूण वार्षिक तरतुदीच्या ८० % (या व्यतिरिक्त ०२ मजुरी यासाठीच्या अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत तरतूदीच्या १००%) निधी वितरीत करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सन २०१८-१९ या वर्षाकरीता संत तुकाराम वनग्राम योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय विजेत्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना पारितोषिकांसाठी २४०६१५२१ या लेखाशीर्षाअंतर्गत रु.७५.०० लक्ष निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३ येथील दि.२५.१.२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार “ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (२४०६ १५२१)” या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या निधीमधून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास),

महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ येथील पत्रांन्वये शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रु.७५.०० लक्ष इतका निधी सन २०१८-१९ या वर्षाकरिता संत तुकाराम वनग्राम योजनेंतर्गत जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय विजेत्या संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना पुरस्कार वितरणासाठी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधी या विभागाकडून मंजूर केलेल्या प्रस्तावातील क्षेत्र / कार्यक्रम / कामे यावरच खर्च होईल व कामाची द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी असल्याची व त्याचबरोबर सध्या वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. मागील वर्षी सदर योजनेकरिता वितरित केलेल्या निधीच्या विनियोगाबाबतचे प्रमाणपत्र सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या संदर्भ क्र.२ वरील दि.०६.०२.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकातील अटी व शर्तींची पूर्तता करण्यात येईल याची देखील दक्षता घ्यावी.

सदर योजनेवर होणारा खर्च मागणी क्र.सी-७, प्रधान शीर्ष २४०६ वनीकरण व वन्य जीवन, १०१ वनसंधारण व विकास, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (११)(१०) ग्राम परिसर व आदिवासी विकास कार्यक्रम (२४०६ १५२१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र.३वरील दि.२५.१.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५ भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२६१२३३२०७८१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad22913 71a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.02.26 12:35:05 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

४) सर्व अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

५) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा.)/मुख्य वनसंरक्षक (धोरण व तंत्रज्ञान)/(संयुक्त वनव्यवस्थापन व नियोजन)

६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

७) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.

८) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.

९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१०) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२.

११) निवडनस्ती , फ-२ कार्यासन,महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.